मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या दोन प्रभागांतील आरक्षणात बदल

## महापालिकेचा निर्णय; वेळेत कर भरून अतिरिक्त भुर्दंड दंड टाळण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी प्रभागातील जागांची आरक्षण सोडत मंगळवारी (ता. ११) काढली. त्यातील प्रभाग १९ व ३० मधील प्रत्येकी एका जागेत निवडणूक आयोगाने बदल सुचवले. त्यानुसार महापालिका आयुक्तांनी प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण सोमवारी (ता. १७) प्रसिद्ध केले. त्यावर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या आहेत.

> “ महापालिका निवडणूक प्रभाग आरक्षण सोडतीचा अहवाल निवडणूक आयोगाला सादर केला होता. त्यांनी प्रभाग १९ व ३० मधील जागांबाबत दुरुस्त्या सूचवल्या होत्या. त्यानुसार दुरुस्ती करून प्रभागनिहाय प्रारूप आरक्षण प्रसिद्ध केले आहे. त्यांवर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना मागवल्या आहेत.
>
> - सचिन पवार, उपायुक्त, निवडणूक विभाग, महापालिका.

# महापालिका प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे शहर प्रदूषणाच्या विळख्यात : खासदार बारणे

## कोट्यवधी रुपये खर्च करूनही प्रदूषण कमी होत नाही; खासदार श्रीरंग बारणे

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड शहरात प्रचंड प्रदूषण वाढले आहे. लोकसंख्येने मोठ्या असलेल्या शेजारील पुण्यापेक्षा पिंपरीतील प्रदूषणात वाढ झाली आहे. शहर प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे. याला सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार असून कोट्यवधी रुपये खर्च करुनही प्रदूषण कमी होत नसल्याचा आरोप शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे.

# आरक्षण सोडतीतील दुरुस्तीनंतर चार जागांमध्ये बदल

## आरक्षण सोडतीतील त्रुटी दुरुस्त; प्रभाग 19 आणि 30 मधील चार जागांचे चित्र बदलले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी ११ नोव्हेंबर रोजी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात काढलेल्या आरक्षण सोडतीनंतर आता राज्य निवडणूक आयोगाने दोन प्रभागांतील चार जागांमध्ये महत्त्वाचे बदल केले आहेत. आरक्षण सोडतीत तांत्रिक त्रुटी झाल्याचे लक्षात आल्यानंतर आयोगाने केलेल्या दुरुस्तीचा थेट परिणाम प्रभाग क्रमांक १९ आणि ३० मधील ओबीसी आणि महिला आरक्षणावर झाला आहे.



निवडणूक आयोगाच्या दुरुस्तीनुसार प्रभाग क्रमांक ३० मधील ओबीसी प्रवर्गासाठी निश्चित झालेली 'क' जागा महिलांसाठी राखीव करण्यात आली आहे. तसेच या प्रभागातील 'ड' जागा जी सर्वसाधारण महिलांसाठी राखीव होती, ती आता सर्वसाधारण म्हणून खुली करण्यात आली आहे. या बदलाचा परिणाम प्रभाग क्रमांक १९ वरही झाला आहे. सोडतीत महिलांसाठी राखीव ठरलेली 'ब' ओबीसी जागा आता सर्वसाधारण ओबीसी झाली असून 'क' सर्वसाधारण जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात आली आहे.

आयोगाने नमूद केले आहे की, ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीसाठी जागा राखीव असतील परंतु महिलांसाठी राखीव नसतील, अशा प्रभागांमध्ये ओबीसी प्रवर्गातील जागा महिलांसाठी राखणे आवश्यक आहे. ही तरतूद प्रभाग ३० मध्ये न वापरल्याने झालेली चूक दुरुस्त करण्यात आली.

या दुरुस्तीमुळे अनेक इच्छुकांच्या गणितात मोठा बदल होण्याची शक्यता असून काही संभाव्य उमेदवारांना जागा बदलावी किंवा रणनीती नव्याने आखावी लागणार आहे. तथापि, ही दुरुस्ती पूर्णपणे नियमांनुसारच करण्यात आल्याचा दावा निवडणूक विभागाने केला आहे. आरक्षणासंबंधी कोणतीही हरकत नागरिक १७ ते २४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत निवडणूक विभागाकडे नोंदवू शकतात, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन पवार यांनी दिली.

### बदलानंतरचे आरक्षण चित्र

» प्रभाग क्रमांक १९ : उद्योगनगर, विजयनगर, भाटनगर, पिंपरी कॅम्प
अ – अनुसूचित जाती (महिला)
ब – नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग
क – सर्वसाधारण (महिला)
ड – सर्वसाधारण

» प्रभाग क्रमांक ३० : दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी
अ – अनुसूचित जाती
ब – अनुसूचित जमाती (महिला)
क – नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)
ड – सर्वसाधारण

# 'रिव्हर सायक्लोथॉन'साठी 25 हजार सायकलपटूंची नोंदणी पूर्ण!

## पुन:श्च विश्वविक्रमाच्या दिशेने वाटचाल: ऐतिहासिक उपक्रमासाठी उरले अवघे 5 दिवस, उत्कंठा शिगेला

**पिंपरी | प्रतिनीधी**

इंद्रायणी नदी स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या 'रिव्हर सायक्लोथॉन 2025' या भव्य उपक्रमाला पुणे- पिंपरी-चिंचवडकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. डुडूळगाव, मोशी येथील 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र येथे दि. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता होणाऱ्या या सायक्लोथॉनसाठी आतापर्यंत २५ हजाराहून अधिक सायकलपटूंची नोंदणी पूर्ण झाली असून, अवघे ५ दिवस शिल्लक असताना आणखी मोठ्या प्रमाणावर नोंदणी वाढण्याची शक्यता आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.

आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून प्रतिवर्षी भोसरी येथील गावजत्रा मैदानावर होणारा सायक्लोथॉन यंदा प्रथमच नव्या, अधिक प्रशस्त आणि सुव्यवस्थित




ठिकाणी मोशी येथे आयोजित केली जात आहे. पुणे–नाशिक महामार्गालगतचे हे ठिकाण मोठ्या सहभागासाठी अधिक योग्य असल्याने, आयोजकांकडून ३५ हजाराहून अधिक सायकलपटूंच्या सहभागाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे गतवर्षी या सायक्लोथॉनची -जगातील सर्वात लांब सायकल रांग' म्हणून 'गिनिज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली आहे. आता पुन्हा एकदा यंदाची सायक्लोथॉन नवा विश्वविक्रम प्रस्थापित करण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

या उपक्रमाचे संयुक्त आयोजन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, अविरत श्रमदान, सायकल मित्र, WTE फाउंडेशन आणि महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन करीत असून, पर्यावरण संवर्धन, आरोग्य आणि नदी स्वच्छतेचा संदेश समाजापर्यंत पोचवणे हा उद्देश आहे. उपक्रमाची तयारी आता अंतिम टप्प्यात आहे.

> रिव्हर सायक्लोथॉनमध्ये २५ हजार सायकलपटूंनी नोंदणी करून दिलेला प्रतिसाद प्रेरणादायी आहे. आता उरलेले पाच दिवस अत्यंत महत्त्वाचे आहेत. अधिकाधिक नागरिकांनी यात सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश संपूर्ण जगापर्यंत पोहोचवावा. मोशी येथील नव्या ठिकाणी सर्व सुविधा, सुरक्षा व पार्किंगची योग्य व्यवस्था केली आहे. चला, इंद्रायणी नदीसाठी, पर्यावरणासाठी आणि भावी पिढ्यांसाठी एकत्र येऊ आणि नवा इतिहास घडवूया.
>
> **- डॉ. निलेश लोंढे, मुख्य समन्वयक, रिव्हर सायक्लोथॉन.**

# पुण्यात गुरुवारी पाणीपुरवठा राहणार बंद !

## मतदान केंद्रे, सुविधा, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व मतदार यादी अद्ययावत करण्यावर आयुक्तांचा भर

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांमधील महापालिकेच्या जलकेंद्रांच्या देखभाल दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. यामुळे येत्या गुरुवारी (२० नोव्हेंबर) संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तर शुक्रवारी (२१ नोव्हेंबर) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. वेगवेगळ्या प्रकारची दुरुस्ती, फ्लो मीटर बसवणे, व्हॉल्व्ह बसवणे ही कामे करण्यासाठी हा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.




नवीन पर्वती जलशुद्धीकरण केंद्र, जुने पर्वती जलशुद्धीकरण केंद्र, पर्वती टँकर पॉइंट, वडगाव जलशुद्धीकरण केंद्र, राजीव गांधी पंपिंग स्टेशन, लष्कर जलकेंद्र, चिखली जलकेंद्र, वारजे जलकेंद्र व त्या अखत्यारितील चांदणी चौक टाकी परिसर, गांधी भवन टाकी परिसर, पँनकार्ड क्लब जीएसआर टाकी परिसर, शिवणे इंडस्ट्रीज परिसर, एसएनडीटी एचएलआर टाकी, चतु:श्रृंगी टाकी, होळकर जलकेंद्र, खडकवासला जॅकवेल या केंद्रांमध्ये ही कामे होणार आहेत.

खडकवासला धरण ते पर्वती जलकेंद्रापर्यंत तीन हजार मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आलेली आहे. खडकवासला धरणातून दोन १४०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनी ३००० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीला जोडण्यात आली आहे. या जलवाहिनीवर फ्लो मीटर बसविणे, बटरफ्लाय वॉल्व्ह बसविणे, वडगाव जलशुद्धीकरण फेज २ ची क्षमता वाढविण्यासाठी नवीन संपवेल टाकीच्या भिंतीला कोअर कटिंग करण्यासाठी धरणातून होणारा संपूर्ण पाणीपुरवठा सकाळी सहा ते रात्री बारा बंद ठेवावा लागणार आहे. त्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी कळविले आहे.

**पाणीपुरवठा बंद राहणारा भाग पुढीलप्रमाणे :**

शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परीसर, रोशिवाजीनगर परिसर, स्वारगेट परिसर, सहकार नगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणी नगर, लेक टाऊन, हन कृतिका, राजेंद्रनगर, लोकमान्य नगर, डेक्कन परिसर, शिवतेजनगर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, महेश सोसायटी, बिबवेवाडी गावठाण, प्रेमनगर, आंबेडकरनगर डायस प्लॉट, सॅलेसबरी पार्क, शिवनेरी नगर, भाग्योदय नगर, कोंढवा खुर्द, पर्वती दर्शन, तळजाई, कात्रज परीसर, ठाकरे वसाहत, पर्वती गावठाण, मिठानगर, धनकवडी परीसर, गुरुवार पेठ, बुधवार पेठ, काशेवाडी, क्वार्टरगेट परिसर, गंज पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, सोमवार पेठ, अरुण वैद्य स्टेडीयम परिसर, घोरपडे पेठ वडगाव जलकेंद्र परीसर : हिंगणे, आनंदनगर, वडगाव, धायरी, आंबेगावपठार, दत्तनगर, धनकवडी, कात्रज, भारती विद्यापीठ परीसर, आंबेगाव खुर्द, आंबेगाव बुद्रुक, येवलेवाडी, आंबेडकरनगर, दाते बस स्टॉप परिसर.

लष्कर जलकेंद्र अंतर्गत पाणी पुरवठा बंद असणारा भाग : हडपसर परिसर, सातववाडी, ससाणे नगर, काळे पडळ, बी.टी-कवडे रोड, भीमनगर, कोरेगाव पार्क, रामटेकडी इंडस्ट्रीयल एरिया, वानवडी, जगताप चौक परिसर, जांभूळकर मळा, काळेपडळ, हांडेवाडी रोड, महमदवाडी गाव, कोंढवा खुर्द, कोंढवा गावठाण, मिठानगर, भाग्योदय नगर, लुल्लानगर, पुणे कॅन्टोनमेंट बोर्ड, केशवनगर, साडेसतरा नळी, फुरसुंगी, उरुळी देवाची, मांजरी, शेवाळवाडी, खराडी, वडगाव शेरी, संपूर्ण ताडीवाला रोड, मंगळवार पेठ, मालधक्का रोड, येरवडा गाव, एनआयटीएम रोड, रेसकोर्स, लोहगाव, विमाननगर, वडगाव शेरी, कल्याणीनगर, विश्रांतवाडी, फुलेनगर, येरवडा

चांदणी चौक टाकी परिसर : पाषाण, भूगाव रोड, कोकाटे वस्ती, संपूर्ण बावधन परिसर, उजवी भुसारी कॉलनी व डावी भुसारी कॉलनी, चिंतामणी सोसायटी, गुरुगणेश नगर, सुरज नगर, सागर कॉलनी, भारतीनगर, बावधन परिसर, सारथी शिल्प सोसायटी, पूजा पार्क, शांतीबन सोसायटी परिसर, डुक्कर खिंडीकडील भाग, शास्त्रीनगर, न्यू लक्ष्मीनगर, परमहंस नगर, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, सुस रोड.

एस.एन.डी.टी. (पाण्याची टाकी) : गोखलेनगर, औध, बोपोडी, पुणे विद्यापीठ, लॉ कॉलेज रोड, महाबळेश्वर हॉटेल पर्यंत बाणेर रोड, बीएमसीसी कॉलेज रोड, भोसलेनगर, सेनापती बापट रोड, भांडारकर रोड, प्रभात रोड, पौड रोड, भीमनगर, वेदांतनगरी, करिष्मा सोसायटी समोरील परिसर, मयुर कॉलनी परिसर, दशभुजा गणपती ते नळस्टॉप, सहकार वसाहत म्हात्रे पुलापर्यंत, मंगेशकर हॉस्पिटल, हिमाली सोसायटी, वकीलनगर, गिरिजा शंकर, नवसह्याद्री, ताथवडे उद्यान परिसर, निलकमल युनायटेड वेस्टर्न.

वारजे जलकेंद्र : कर्वेनगर गावठाण परिसर, तपोधाम सोसायटी, शाहू कॉलनी, इंगळेनगर, वारजे जकात नाका परिसर, कर्वेनगर, बाणेर, बालेवाडी, चाकणकर मळा, पॅनकार्ड क्लबरोड, विधाते वस्ती, मेडिपॉईट रोड, आंबेडकरनगर, दत्तनगर, अहिरेगाव, माळवाडी, यशोदिप चौक, मामासाहेब मोहोळ शाळा परिसर, गणपती माथा परिसर, एनडीए रोड. होळकर जलकेंद्र : मुळा रोड, खडकी कॅन्टोनमेंट संपूर्ण परिसर, हरीगंगा सोसायटी, कोंढवे-धावडे जलकेंद्र : वारजे हाय-वे परिसर, रामनगर, उत्तम नगर, शिवणे, कोंडवे धावडे, न्यु कोपरे परिसर.

गांधी भवन टाकी परिसरः काकडे सिटी, होम कॉलनी, सिप्ला फाउंडेशन, रेणुकानगर, पाप्युलर कॉलनी, वारजे माळवाडी, गोकुळनगर, महात्मा सोसायटी परिसर, भुजबळ टाऊनशिप, एकलव्य कॉलेज परिसर, कुमार परिसर, धनंजय सोसायटी, रोहन गार्डन परिसर, अमित पार्क, कांचन गंगा, अलक नंदा, शिवप्रभा, श्रावणधारा झोपडपट्टी, शांतीवन, गांधी स्मारक, किर्लोस्कर डीझेल कंपनी, लक्ष्मीनगर झोपडपट्टी, मुंबई पुणे बायपास रोड दोन्ही बाजू, श्रीराम सोसायटी, गिरीष सोसायटी, तिरुपती नगर, कुलकर्णी हॉस्पिटल परिसर, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर गावठाण, तपोधाम परिसर, राम नगर, गोसावी वस्ती, कॅनॉल रोड.

# पुणे ते शिरूर, शेंद्रा ते बिडकीन, बिडकीन ते ढोरेगाव रस्ता निर्मितीला मान्यता

## छत्रपती संभाजी नगर ते अहिल्यानगर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी : मुख्यमंत्री फडणवीस

**पुणे | प्रतिनीधी**

पुणे ते शिरूर राष्ट्रीय महामार्गावरील ५३.४ किलोमीटर अंतरातील चार पदरी जमिनीला समांतर (ॲट ग्रेड) व सहा पदरी उन्नत महामार्गासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा औद्योगिक वसाहत ते बिडकीन औद्योगिक वसाहत आणि बिडकीन ते ढोरेगाव (छत्रपती संभाजी नगर ते पुणे महामार्ग) सहा पदरी रस्ता निर्मितीला मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यासोबतच नवीन ग्रीनफिल्ड रस्ता छत्रपती संभाजीनगर - जालना डीएमआयसी नोड क्रमांक एक करमाड ते बिडकीन मार्गे समृद्धी महामार्गास सहा पदरी रस्ता जोडणी या नवीन आखणीस तत्वतः मान्यता देण्यात आली.

छत्रपती संभाजी नगर ते अहिल्यानगर दरम्यान सद्यस्थितीत असलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांचा त्रास कमी करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.



बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, पुणे ते शिरूर या महामार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग आणि चार पदरी जमिनीच्या समतल (ॲट ग्रेड) मार्गाचे काम तीन वर्षात पूर्ण करावे. रस्ता विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावा. या रस्त्याच्या निर्मितीमध्ये कुठही दिरंगाई होऊ नये. पुणे ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर पुणे ते शिरूर दरम्यान औद्योगिक वसाहती असल्याने वाहनांची अत्यंत वर्दळ आणि भविष्यातील वाढणारी वाहनांची संख्या लक्षात घेता महामार्गाचे काम विनाविलंब सुरू करावे.

पुणे ते शिरूर महामार्गावर ३५ किलोमीटर उन्नत महामार्गापैकी ७.४० किलोमीटर लांबीमध्ये जमिनीला समांतर रस्ता, त्यावर रस्ता व वरती मेट्रो अशा व्हाया डक्टची निर्मिती महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास मंडळ यांनी समन्वयाने करावी. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शेंद्रा (करमाड) ते बिडकीन या ३२.८ किलोमीटर लांबी, बिडकीन ते ढोरेगाव या २६ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी रस्ता निर्मितीच्या कामासाठी आवश्यक जमिनीचे भूसंपादन तातडीने सुरू करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

# भटक्या कुत्र्यांची माहिती आता एका 'क्लिक'वर!

## राज्यातील 'मायक्रोचिप' बसविण्याचा पहिलाच प्रकल्प पुण्यात सुरू



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने भटक्या श्वानांना मायक्रोचिप बसविण्याचे पाऊल उचलले आहे. राज्यातील हा पहिलाच पथदर्शी प्रकल्प असून, यामुळे पुण्यातील भटक्या श्वानांची माहिती आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. मायक्रोचिपमुळे श्वानाचा विशिष्ट ओळख क्रमांक, त्याचे लिंग, रंग, वय यांसह इतर माहिती ऑनलाइन मिळू लागली आहे.

पुण्यातील भटक्या श्वानांची एकूण संख्या सुमारे तीन लाखांवर पोहोचली आहे. भटक्या श्वानांकडून नागरिकांवर हल्ले होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहेत. यामुळे महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून श्वानांची नसबंदी करण्याची मोहीम सातत्याने राबविली जात आहे. याचबरोबर श्वानांना रेबीज प्रतिबंधक लसही दिली जात आहे. आता पशुवैद्यकीय विभागाने शहरातील श्वानांना मायक्रोचिप बसविण्यास सुरुवात केली आहे. मायक्रोचिप बसविल्यानंतर प्रत्येक श्वानाला विशिष्ट क्रमांक दिला जात आहे. त्या श्वानाला कधी पकडण्यात आले, त्याची नसबंदी करण्यात आली का, त्यानंतर त्याला कधी सोडण्यात आले यांसारखी माहिती ऑनलाइन उपलब्ध होऊ लागली आहे. यामुळे आगामी काळात कुत्र्यांची संख्या आटोक्यात आणण्यासाठी आणि रेबीज नियंत्रणासाठी हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

याबाबत महापालिकेच्या मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे म्हणाल्या की, एका खासगी कंपनीकडून या चिप मोफत मिळाल्या आहेत. या चिप कुत्र्यांच्या खांद्याच्या भागात इंजेक्शनद्वारे टोचल्या जात आहेत. या चिपमध्ये आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या मायक्रोचिपला विशिष्ट क्रमांक असून, तो कुत्र्याला मिळतो. कर्मचाऱ्याला त्याच्याकडील स्कॅनरच्या साहाय्याने कुत्र्याचा खांदा स्कॅन करून या क्रमांकाच्या आधारे त्याची सर्व माहिती मिळवता येते. सुरुवातीच्या टप्प्यात सहाशे कुत्र्यांना मायक्रोचिप लावण्याचे नियोजन करण्यात आले असून, याची सुरुवात झाली आहे.

### मायक्रोचिपचा फायदा..

- खांद्यावर त्वचेच्या खालच्या स्तरावर बसविल्याने निघून जाण्याची शक्यता कमी
- बनावट मायक्रोचिप बनवता येत नसल्याने सुरक्षिततेची हमी
- विशिष्ट क्रमांकामुळे श्वानाची संपूर्ण माहिती ऑनलाइन उपलब्ध
- एकदा बसविल्यानंतर पुन्हा बसविण्याची गरज नाही
- श्वानाची नसबंदी, लसीकरणाची अद्ययावत माहिती ऑनलाइन उपलब्ध

> "भटक्या श्वानांना मायक्रोचिप बसविण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत तीन श्वानांना मायक्रोचिप बसविण्यात आली आहे. या श्वानांवर महिनाभर लक्ष ठेवण्यात येणार आहे. मायक्रोचिप बसविल्यानंतर त्यांना काही त्रास होत नसल्याची तपासणी महिनाभरानंतर केली जाईल. त्यानंतर इतर श्वानांना मायक्रोचिप बसविण्यात येईल.
>
> **– डॉ. सारिका फुंडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी, पुणे महापालिका.**

# गुंठेवारीतील घरे नियमितीकरणाला अल्प प्रतिसाद

## गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी दिलेल्या मुदतीमध्ये अवघे दोनशे प्रस्ताव




**पुणे | प्रतिनीधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी दिलेल्या मुदतीमध्ये अवघे दोनशे प्रस्ताव पीएमआरडीला प्राप्त झाले आहेत. घरे नियमितीकरणासाठी चारवेळा मुदतवाढ देऊनही आणि नियमितीकरणाच्या शुल्कामध्ये कपात करूनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

राज्य शासनाने गुंठेवारी अधिनियम २००१ मध्ये अलीकडेच सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार पीएमआरडीएने ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची बांधकामे नियमित करता येणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार पीएमआरडीएने मध्यंतरी गुंठेवारीची घरे नियमित करण्यासाठीची मोहीम हाती घेतली. पीएमआरडीए हद्दीतील सुमारे ७०० गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. त्यासाठी ही घरे नियमित करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. याशिवाय महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडे आहेत. या गावांमध्ये ही मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. मात्र वारंवार मुदत वाढ देऊनही अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी पीएमआरडीएकडून अशी घरे नियमित करण्यासाठी ३१ मार्च पर्यंत मुदत दिली होती. ही मुदत उलटून गेल्यानंतर आता पुन्हा पीएमआरडीएने अर्ज करण्यास सहा महिने मुदत वाढ देण्याचा निर्णय घेतला. ही मुदत ३० सप्टेंबरपर्यंत होती. ती मुदतही नुकतीच संपुष्टात आली. या मुदतीत केवळ दोनशे घरांचे प्रस्ताव नियमितीकरणासाठी दाखल झाले झाल्याची माहिती पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

राज्य शासनाने दिलेल्या सूचनेनुसार नियमितीकरणासाठीचे शुल्क देखील प्राधिकरणाने कमी केले. त्यामुळे घरे नियमितीकरणाला प्रतिसाद मिळेल,असे अपेक्षित होते.

### ही बांधकामे नियमित होणार नाहीत...

- घरे नियमितीकरण करताना रेड झोन, बफर झोन, हिल टॉप हिल्स, स्लोप झोन, शेती तथा ना विकास झोन, वनीकरण झोन, शासकीय-खासगी वने, प्रादेशिक योजनेतील तसेच प्रारूप विकास आराखड्यातील रस्ते आणि आरक्षणे, नदी पात्र, सरकारी जागा आदी झोनमधील बांधकामे नियमित होणार नसल्याचे पीएमआरडीएने यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

> "पीएमआरडीएच्या हद्दीत अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी देण्यात आलेल्या कालावधीत अपेक्षित अर्ज आलेली नाहीत. त्यासाठीची मुदत तीस सप्टेंबर रोजी संपुष्टात आली आहे. पुन्हा मुदतवाढ देण्यासंदर्भात अद्यापही निर्णय झालेला नाही.
>
> **– डॉ योगेश म्हसे, महानगर आयुक्त, पीएमआरडीए.**